Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's
SHRI SHAHAJI CHHATRAPATI MAHAVIDYALAYA
2968, 'C' DasaraChowk, Kolhapur-416 002.
Estd. 1971
Affiliated to - Shivaji University, Kolhapur-416 004, Maharashtra
Accredited by NAAC (3rd Cycle) with Grade 'A' (CGPA-3.13)
Website : www.shahajicollege.ac.in
E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in
Prin. Dr. R. K. Shanediwan - M.A. B.Ed. Ph.D.NET (Marathi) B.J.
Phone : (O) (0231) 2644204, (M) 9960995853

जा. क्र. : एसएससीएम/फा – /573/ २०२४-२५ दिनांक : २३/०९/२०२४

प्रति,

मा. अर्थशास्त्र विभाग प्रमुख

महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

विषय: निबंध स्पर्धेसाठी निबंध पाठवण्याबाबत

महोदय,

आपल्या महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभागामार्फत संपन्न होत असलेल्या 'विकसित भारत @2047' या संकल्पनेवर आधारीत निबंध स्पर्धेसाठी आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाकडून दोन विद्यार्थ्याचे निबंध पाठवत आहोत.तरी आपण त्याचा स्विकार करावा. ही नम्र विनंती.

कळावे,

१) प्रेमा यशवंत कांबळे
२) संदिप रामचंद्र कांबळे

आपला विश्वासू

प्राचार्य,
श्री शहाजी छत्रपती
महाविद्यालय, कोल्हापूर.
डॉ.

Received
24/9/24

Dr. Sujata Jitendra Patil
Head
Department of Economics
Mahavir Mahavidyalaya, Kolhapur.

DATE / /

# श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय

दसरा चौक . कोल्हापूर


नाव - हेमा यशवंत कांबळे

मु.पो. - चिंचवडे तर्फ कळे , ता. करवीर जि. कोल्हापूर

हजेरी क्रमांक - ६३

मोबाईल नंबर. ७२०८६७३९५९५

विभाग - अर्थशास्त्र




निबंधाचा विषय

# विकसित भारत संधी व आव्हाने

प्रस्तावना :-

सन १६०८ मध्ये ब्रिटीश लोक ईस्ट इंडिया कंपनीच्या स्वरूपात भारतामध्ये व्यापार करायला आले. महाराणी एलिझाबेथ लिन (पहिली) ने संमत केलेल्या १६०० च्या सनदेअंतर्गत भारतात व्यापार करण्याचा अधिकार कंपनीला मिळाला होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत हा सत्ता कारभार कायम होता.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेची गरज भासू लागली. सन १९४६ मध्ये या उद्देशाकरिता संविधान सभा स्थापन करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारताची स्वतंत्र अशी राज्यघटना अस्तित्वात आली.

भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन

भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन १९४७ साली झाला. भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी देशाचा तिरंगा ध्वज फडकवला. हा स्वातंत्र्यदिन सोहळा लाल किल्ल्यावर झाला. तेव्हापासून दरवर्षी भारताचे पंतप्रधान लाल किल्ल्यावर तिरंगा ध्वज फडकवतात. १५ ऑगस्त १९४७ रोजी भारत हा ब्रिटीश राजवटीतून स्वतंत्र्य झाला. नवी दिल्लीतील लाहोरी गेटवर ध्वज फडकवण्यात आला. भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन त्या शूर पुरुष आणि स्त्रियांना समर्पित आहे, "ज्यांनी आपल्या मातृभूमीला मुक्त" करण्यासाठी आपल्या प्राणांची आहूती दिली.

"खर पाहता आपला देश हा अनादी काळापासून समृद्ध आणि संपन्न आहे. आपली भूमी ही साधू संतांची आणि ऋषी मुनींच्या, महापुरुषांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून आपणास विपुल ग्रंथ संपदा व साहित्य संपदा लाभली आहे. वेद शास्त्र, पुराण सारखी महान ग्रंथ इथे निर्मिली आहे." जगाला हेवा वाटावा असा आपला देश होता, आहे. विविधतेने नटलेला व संस्कृती प्रधान हा आपला देश असून मुळात आपली संस्कृती ही "सिंधु संस्कृती" आणि आपला मुळ व्यवसाय म्हणजे पशु पालन आणि शेती होय. शेती प्रधान आणि आपली अर्थव्यवस्था असल्यामुळे आपण अनादी काळापासून आस्मानी, सुलतानी संकटांचा सामना करीत आज पावेतो खंबीरपणे उभे आहोत.

अगदी कोरोना सारख्या जागतिक महा संकट काळात अगदी जगातील चांगल्या-चांगल्या महासत्तांची पाचवार लागली, असतांना ही अजूनही बरेच देश कोरोनाच्या महामारीच्या लाटेतून सावरलेले नाहीत, अशा ही परिस्थित आपण तग धरुन बसलो आणि आपल्या भारत देशाची अर्थव्यवस्था ही सांभाळली हे विशेष असून आगामी काळात काही ठोस निर्णय व सुधारणा करुन आपणास "आत्मनिर्भर भारत" बनविणे ही काळाची गरज आहे.

कधी काळी आपल्या देशात सोन्याचा धुर निघत होता असे म्हटले जाते, आणि हे खोटे ही नाही पण परकिय आक्रमणांनी व राजकिय भ्रष्ट व्यवस्थेने आपल्या देशाला दुःखाच्या खाईत लोटले आहे हे ही विसरुन चालणार नाही आणि अशा परिस्थिती आज आपल्या देशाला आपल्या पुढे न्यायचे आहे. "अब नही तो कब नही" अशी आपल्या भारत देशाची अवस्था झालेली आहे.

"आत्मनिर्भर भारत" म्हणजे थोडक्यात स्वावलंबी दुसऱ्यावर न विसंबून राहणरा अगदी टिळकांचे ही हेच स्वप्न होते, म्हणून तर स्वदेशी आणि स्वराज्याची संकल्पना मांडली होती की जी संकल्पना १६ व्या शतकात छत्रपती शिवरायांनी अभिप्रेत होती. आपणास छत्रपतींच्या स्वराज्याची संकल्पना मुळात समजलीच नाही. स्वराज्य म्हणजे केवळ स्वतःचे राज्य एवढेच नाही तर, आर्थिक, सामाजिक व संरक्षणात्मक दृष्टा, सक्षम, कुण्यावर ही विसंबून न राहणारा म्हणून तर राज्यांनी राजाच्या रक्षणार्थ सक्षम आरमार व शेती याठी सिंचनावर भर देऊन शेती प्रधान अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी शेतकरी व शेतहिताचे महत्वपूर्ण निर्णय महाराजांनी घेतले होते.

बेरोजगारी दुर करण्यासाठी प्रभावी निर्णय घेणे आवश्यक आहे. आजही आपणास आपली अर्थव्यवस्था मजबुत करण्यासाठी व शेती उद्योग व्यवसाय मजबूत करुन रोजगाराच्या संख्या उपलब्ध करण्या-साठी प्रभावी निर्णय घेणे आवश्यक आहे. आणि आपले आजचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या धोरणात्मक निर्णयावरुन लक्षात येते कि त्यांची वाच-वाटचाल आत्मनिर्भर भारत व विश्वाचे नेतृत्व करण्याच्या दिशेने होत आहे.

स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडिया, मेड इन इंडिया वरुन लक्षात येते कि आपण निर्मिती क्षेत्राला प्राधान्य देत आहोत. पूर्वी निर्मिती क्षेत्रांमध्ये आपण इतर राष्ट्रांवर विसबून होतो, म्हणजेच उद्योग क्षेत्रातील लागणारी साधन सामग्री, कच्चा माल, वीज निर्मिती औषध निर्मिती इत्यादी सारख्या क्षेत्रात आपण स्तरावर म्हणजेच चिन वर अवलंबुन रहावे लागत होते, आणि त्यामुळे जगात लोकसंख्येने मोठा असुन ही चीन जगाशी स्पर्धा करीत आहे, आणि त्याकरिता आपणास देशी उद्योग धंदे व लघु उद्योग विकासावर भर देणे अधिक आवश्यक आहे. देशामध्ये परदेशी गुंतवणूक वाढवून रोजगारांच्या अधिका- अधिक संख्या निर्माण करणे आवश्यक आहे. आणि त्या दिशेने आपली वाटचाल हि दिसत आहे. कोरोना काळात तर आपण प्रभावी लस तयार करुन जगातील अनेक विविध देशांना पुरविली. हि खऱ्या अर्थाने जागितिक स्तरावरती आपली "आत्मनिर्भर" भारताची पायाभरणी आहे.

उद्योग उभारणी प्रत्येक हि राज्यात व्हायला हवी. केवळ मुंबई बंगलोर, चेन्नई, हैद्राबाद किंवा पुणे या शहरांना केंद्र बिंदु मानून चालणार नाही. अनेक छोट्या राज्यांनी आपल्या अनेक छोट्या-मोठ्या जिल्ह्यांमध्ये किंवा शहरामध्ये विविध प्रकारचे उद्योग-धंद्यांना परवानगी किंवा चालना द्यायला हवी, तर आपल्या भारत देशाच्या आर्थिक उत्पनात म्हणजेच अर्थव्यवस्थेस चालना मिळेल. तर सरकारने मोठ-मोठ्या कारखाने असे नव्हे तर छोटी-मोठी व्यवसायावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

आज "आत्मनिर्भर भारत कडे" वाटचाल करीत असतांना अनेक प्रकारची आव्हाने ही मोठ्या प्रमाणात असणार आहेत, आणि संधीचा ही अभाव दूर करावा लागणार आहे, आज आपल्या देशात बेरोजगारीचे प्रमाण फार मोठे असून तरुणांचा मोठा समूह हा बेरोजगार आहे.

DATE / /

आपण 2022 व 2023 मध्ये महाराष्ट्रामध्ये झालेली पोलिस भरतीची परीक्षा असेल किंवा तलाठी पदाची भरतीची परीक्षा असेल या भरती प्रक्रियेसाठी अनेक उच्च शिक्षित तरुण म्हणजेच डॉक्टर, वकिल इंजिनिअरिंग सारख्या उच्च शिक्षित तरुणांनी ही भाग घेतला होता. या वरुन लक्षात येते कि आपल्या भारत देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण किती मोठ्या प्रमाणावर आहे. याला कारण म्हणजे आपल्या भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये दम नसावा, किंवा विद्यार्थी तडजोडिस तयार नसावेत. आत्मनिर्भर बनण्यासाठी आपण जैविक विविधेवर आधारीत असणाऱ्या राष्ट्रांचा आदर्श घेणे गरजेचे आहे. उदा.... अमेरीका हा अर्थव्यवस्थेच्या बाबतित अनेक राष्ट्रांच्या तुलेनेत अधिका-अधिक शिखरावर आपल्याला दिसतो, त्यानंतर चिन असेल चिन हा अर्थव्यवस्थेत जागितीत स्थरावर आपल्याला दुसऱ्या क्रमांकर वर दिसून येतो, या अशा अनेक बलाढ्य राष्ट्राचा आपण आदर्श घेणे २१ व्या शतकामध्ये अधिक गरजेचे वाटते.

खर पाहिलं तर आज ही आपल्या देशाला आत्मनिर्भर भारत बनविणे अवघड नसून फक्त राजकिय व समाजातील सद्सद्विवेक बुद्धीची गरज आहे. आज ही आपण जाती पातीच्या राजकारणात व भेदाभेदात न गुरफटता प्रत्येकाने किमान देशासाठी नव्हे तर आपल्या स्वतःच्या विकासाठी जरी प्रयत्न केले तरी आपण आपला देश आत्मनिर्भर झाल्याशिवाय राहणार नाही. आपआपल्या मुलां-मुलींनी दर्जेदार शिक्षण द्या. त्यांच्या आवडी निवडी नुसार मुलांना शिकू द्या. फालतू राजकारणा मागे न लागता शिक्षण व व्यवसायावर भर दिला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात ही आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे तरच शिक्षणाच्या उद्देश सफल होईल.

शिक्षण क्षेत्रातील गुन्हेगारी व बाजारीकरण रोखण्यासाठी सरकारला कठोर पाऊले उचलावी लागणार आहेत. इतर ठिकाणी खाजगीकरण ला आपण विरोध करतो मग शिक्षण क्षेत्राच्या बाबती का असे नाही कारण ही मुठभर धनदांडग्यांच्या हाती आहे, आणि म्हणून असे राजकारण होत नाही. कधीकाळी तक्षशिला, नालंदा सारखे विश्वविख्यात विद्यापिठे असणाऱ्या देशाची आज ची अवस्था काय आहे. आज शिक्षण बाजार भावामध्ये विकले जात आहे, सगळी शिक्षणाचा बाजार करुन ठेवलेला आहे.

आज आपल्या देशाचे पंतप्रधान मा. मोदीजींचा मुद्रा योजने समबंधी अतिशय स्तुत्य निर्णय असुन प्रत्येकाने केवळ सरकारी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय व शेतीवर अधिक भर दिला पाहिजे. आज शेतीला ही सोन्याचे दिवस आहेत, फक्त आधुनिक तंत्रज्ञानाचा व योग्य पिक पद्धतीचा वापर करुन आपण आपले आयुष्य सुख सुमृद्धी करु शकेल.

# 2047 में मेरा भारत

विकसित देशों की सूची मे
पहुँचेगा मेरा देश,
सभी क्षेत्रों मे उन्नती कर,
करेगा 2047 मे प्रवेश।

सुरक्षित होंगी सीमाएँ
दुश्मन थर-थर कांपेंगे,
भारतीय सैन्य शक्ति के आगे,
सभी दुश्मन भागेंगे।

ज्ञान-विज्ञान के क्षेत्र मे
प्रगति होगी चहुँ ओर,
भारत विश्वगुरु बनेगा
सब देखेंगे इसकी ओर।

सत्यनिष्ठा के साथ आत्मनिर्भरता
को अपनाना हैं,
2047 तक विश्व मे भारत को
कोहिनूर सा चमकाना है।

2047 तक भारत अपनी खास जगह बनाएगा।
एकता, अखंडता और धर्मनिरपेक्षता का
सबको पाठ पढाएगा।

आयुर्वेद और विज्ञान मिल कर
अपना चमत्कार दिखाएंगे,
भारत मे भी दम है,
दुनिया को बतलाएंगे।

नो - चंदन कर्मा